प्रत्येक बातमी तुमच्या पर्यंत

PRGI No.MHMAR/25/A2032

दैनिक

# महाराष्ट्र चौफेर

maharashtrachaufher@gmail.com

मुख्य संपादक : अबरार मिर्झा ▌मो.7770060932

Year :1 | Issue No.: 5 | Friday Date 25 Septembar 2026 | Jalgaon | Price : 5 | Page : 4

वर्ष १ | अंक - ५ | जळगाव | शुक्रवार | दि. २५ सप्टेंबर २०२६ | किंमत ५ रुपये | पृष्ठे ४

## ध्वनिप्रदूषणविषयक आदेशावर स्पष्टीकरण द्या!

मुंबई : बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समितीने धार्मिक मिरवणुकांदरम्यान होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाबाबत मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या अलीकडील आदेशाच्या अंमलबजावणीबाबत त्वरित स्पष्टीकरण देण्याची विनंती महाराष्ट्र सरकारकडे केली आहे. शहरातील प्रमुख मंडळांच्या भव्य विसर्जन मिरवणुकांसह १२ दिवसांचा गणेशोत्सव शुक्रवारी संपन्न होणार आहे. या पार्श्वभूमीवर न्यायालयाच्या निर्णयाबाबत राज्य सरकारची भूमिका स्पष्ट होणे आवश्यक आहे. बुधवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिलेल्या पत्रात समितीने म्हटले आहे की, उच्च न्यायालयाने २२ सप्टेंबरच्या आदेशात विसर्जन मिरवणुकांदरम्यान होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाबाबत अनेक निर्देश दिले आहेत. या आदेशात नियमांचे उल्लंघन झाल्यास कायदेशीर कारवाई करण्याचे आणि गणेश मंडळांकडून किमान १ लाख रुपयांची सुरक्षा ठेव घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, असे समितीने नमूद केले. ही १ लाख रुपयांची रक्कम दंड आहे की सुरक्षा ठेव, ती कोणत्या परिस्थितीत वसूल केली जाईल आणि कोणती यंत्रणा ती वसूल करेल, याबाबत संभ्रम निर्माण झाला असल्याचे पत्रात म्हटले आहे. ध्वनी मर्यादेचे उल्लंघन झाल्यास ही ठेव जप्त करण्याची प्रक्रिया काय असेल आणि त्याव्यतिरिक्त इतर कोणतीही वैधानिक किंवा फौजदारी कारवाई केली जाईल का, यावरही समितीने स्पष्टीकरण मागितले आहे. ज्या गणेश मंडळांनी मिरवणुकीसाठी आधीच परवानगी घेतली आहे, त्यांना हे निर्देश कशा प्रकारे लागू होतील, हे स्पष्ट करण्याची विनंतीही समितीने सरकारकडे केली आहे. न्यायालयाच्या निर्देशांची अंमलबजावणी करताना मुंबई पोलीस, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि इतर यंत्रणांच्या जबाबदाऱ्यांबाबत स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे असावीत, अशी मागणीही करण्यात आली. कोणताही गोंधळ टाळण्यासाठी स्पष्ट आणि एकसमान लेखी मार्गदर्शक तत्त्वे आवश्यक असल्याचे समितीने म्हटले आहे.

## कृषी बाजार समित्यांच्या नोकरभरतीला हिरवा कंदील

पुणे : राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांसाठी नवीन सुधारित आकृतिबंध (स्टाफिंग पॅटर्न) आणि नोकरभरतीची कार्यपद्धती निश्चित करण्याबाबत शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्यानुसार बाजार समित्यांना त्यांच्या आर्थिक क्षमतेनुसार आणि ठरवून दिलेल्या आस्थापना खर्चाच्या मर्यादेत कर्मचारी नियुक्त करता येणार आहेत. शासनाच्या पत्रानुसार, बाजार समित्यांनी नोकरभरती सुरू करण्यापूर्वी राज्याच्या पणन संचालकांकडे प्रस्ताव सादर करून त्याची तपासणी करून घ्यावी लागणार आहे. शासनाची मान्यता मिळाल्यानंतरच संबंधित बाजार समितीला पुढील भरती प्रक्रिया सुरू करता येईल.

# शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत; मदतीचे आदेश आजच काढणार

## ‘ट्रिगर एक’प्रमाणे दुष्काळ जाहीर करण्याचा निर्णय लवकरच – मुख्यमंत्री

अमरावती : दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी केंद्राकडून मदत मिळण्याची प्रतीक्षा न करता राज्याच्या निधीतूनच मदत देण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी दिली. गुरुवारी मुख्यमंत्र्यांनी अमरावती आणि वाशिम जिल्ह्यातील दुष्काळी भागाचा दौरा केला. शेतकऱ्यांना तातडीने मदत व्हावी, यासाठी दुष्काळाच्या संहितेच्या ‘ट्रिगर एक’ नुसार देण्यात येणाऱ्या मदतीचा आदेश शुक्रवारीच काढण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. तसेच दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा करू, असेही त्यांनी सांगितले.

वाशिम येथील दुष्काळग्रस्त भागाचा दौरा केल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी विभागीय आयुक्त नयना गुंडे, अमरावतीचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर, वाशिमचे जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्यासमवेत अमरावती विमानतळ येथे चर्चा केली.



शेतकऱ्यांना दुष्काळाची मदत करण्यासाठी केंद्राच्या मदतीची वाट न पाहता राज्य शासनाकडून तातडीने मदत देण्यात येईल. तसेच केंद्राच्या मदतीसाठी आवश्यक असणारे पंचनामे आदी प्रक्रिया करून मदतीसाठी प्रस्ताव पाठवण्यात येईल. शेतकऱ्यांना मदतीचा आदेश तातडीने काढणे गरजेचे आहे. यातून काही भाग वगळला गेलेला असण्याची शक्यता असल्याने तिसऱ्या ट्रिगरमध्ये वगळलेल्या भागाचा समावेश करू, असे मुख्यमंत्री म्हणाले, सर्वच भागांत मोठ्या प्रमाणावर दुष्काळ असल्याने मदतीची कारवाई करण्यात येणार आहे. येत्या काळात चारा टंचाई, पाणी टंचाईबाबत उपाययोजना करून अन्नधान्याचीही मदत करावी लागणार आहे. शेतकऱ्यांच्या पाल्यांच्या शिक्षणामध्ये खंड पडू नये, यासाठी थेट मदत करण्यात येईल. रब्बीमध्ये काही ठिकाणी उपलब्ध असलेल्या पाण्यावर पिके घेण्याबाबत तपासणी करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

### मदतीचे धोरण आखले

शासनाने मदतीचे धोरण आखले आहे. शेतकऱ्यांना करण्यात येणारी ही मदत दिवाळीपूर्वी मिळेल, याचे नियोजन केले जाईल. शासनाने कर्जमाफी केली असून कर्जाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत आहे. कर्जमाफी मिळालेल्या शेतकऱ्यांना नियमाप्रमाणे बँकांना कर्ज द्यावेच लागेल. त्यासोबतच शेतमालाची शासकीय दराने खरेदी केली जाईल. यासाठी लवकरच नोंदणी सुरू केली जाणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## चाळीसगावच्या दुष्काळी परिस्थितीवर आमदार मंगेश चव्हाण आक्रमक; तातडीने दुष्काळ जाहीर करण्याची मागणी

चाळीसगाव(प्रतिनिधी)–नाशिक विभागातील पिकांची स्थिती व दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी २४ सप्टेंबर रोजी नाशिक विभागीय आयुक्त कार्यालयात कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत चाळीसगाव तालुक्यातील गंभीर दुष्काळी परिस्थितीचा मुद्दा आमदार मंगेश चव्हाण यांनी ठामपणे मांडत तालुका तातडीने दुष्काळग्रस्त घोषित करण्याची मागणी केली.

या बैठकीस जलसंपदा मंत्री तथा नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन, शिक्षणमंत्री दादाजी भुसे, जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांच्यासह



विभागातील लोकप्रतिनिधी, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

आमदार मंगेश चव्हाण यांनी बैठकीत चाळीसगाव तालुक्यात यावर्षी झालेल्या अत्यल्प पावसामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे सांगितले. तसेच पाणीटंचाई आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर बनल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडल्याचे त्यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. दुष्काळी परिस्थितीची गांभीयार्ने दखल घेऊन चाळीसगाव तालुका लवकरात लवकर दुष्काळग्रस्त घोषित करावा, शेतकऱ्यांना जास्तीत जास्त शासकीय मदत द्यावी आणि आवश्यक उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशी मागणी आमदार चव्हाण यांनी बैठकीत केली. बैठकीनंतर आमदार मंगेश चव्हाण म्हणाले, ‍रशेतकरी हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. संकटाच्या काळात शासनाने त्याच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे आवश्यक आहे. चाळीसगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळावी यासाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा करत राहू.

## नुकसानग्रस्तांच्या भरपाईसाठी उद्या निघणार अधिसूचना

सिन्नर : पावसाच्या खंडाने पिके संकटात सापडली असताना, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देणारी घोषणा कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केली आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी आवश्यक अधिसूचना शनिवारी काढण्यात येणार असून, त्यासाठी पंचनामे आणि आवश्यक प्रशासकीय कार्यवाही तातडीने पूर्ण करा, असे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले. सिन्नर तालुक्यातील धोंडवीरनगर येथे पिकांच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करून मंत्री भरणे यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. अधिकारी शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले पाहिजेत, असे निर्देश देत भरणे यांनी नुकसानग्रस्त क्षेत्राची प्रत्यक्ष पाहणी, पंचनामे आणि अहवालाची कार्यवाही विलंब न करता पूर्ण करण्यास सांगितले. यावेळी आमदार अ‍ॅड. माणिकराव कोकाटे, कृषी आयुक्त सुरज मांढरे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने यांच्यासह लोकप्रतिनिधी, शेतकरी उपस्थित होते.

# २,७९२ कोटी जीएसटी अनुदान ऑक्टोबरसाठी महापालिकांना मंजूर

## २५ महापालिकांच्या तिजोरीत १.६८ कोटींच्या कपातीनंतरच जमा होणार रक्कम

मुंबई : राज्य शासनाने माहे ऑक्टोबर २०२६ या महिन्यासाठी राज्यातील महानगरपालिकांना २,७९२ कोटी ८४ लाख रुपयांचे जीएसटी भरपाई अनुदान मंजूर केले असून, नालेसफाई यंत्रांच्या खर्चापोटी १ कोटी ६८ लाख रुपयांची दरमहा कपात करूनच उर्वरित रक्कम २५ महापालिकांच्या तिजोरीत जमा होणार आहे.

नगर विकास विभागाचे कार्यासन अधिकारी धनंजय भागवत यांनी २४ सप्टेंबर २०२६ रोजी यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला आहे. या निर्णयानुसार, नवी मुंबई, जालना, परभणी आणि बृहन्मुंबई वगळता राज्यातील उर्वरित २५ महानगरपालिकांमध्ये मलवाहिन्या व भूमिगत गटारांच्या सफाईसाठी पुरवण्यात आलेल्या ‘सक्शन व जेटिंग मशिन’च्या संचालन व देखभाल खर्चाची १ कोटी ६८ लाख ३४ हजार ७५९ रुपयांची रक्कम परस्पर वळती करून नगर परिषद प्रशासन संचालनालयाकडे वर्ग केली जाईल. त्यानंतर उर्वरित २,७९१ कोटी १५ लाख ६५ हजार २४१ रुपयांचा निधी संबंधित २५ महापालिकांना वितरीत करण्यात येईल. सह सचिव (न.वि.-५) हे नियंत्रक अधिकारी, तर अवर सचिव (न.वि.-५) हे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम पाहतील. ९ फेब्रुवारी २०२४ च्या शासन निर्णयानुसार सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्य सुरक्षिततेसाठी हे तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यात आले आहे. या यंत्रांचा आवश्यक निधी स्थानिक स्वराज्य संस्थांनी उपलब्ध न केल्याने तो राज्य स्तरावरून मिळणाऱ्या जीएसटी अनुदानातूनच परस्पर समायोजित केला जात आहे.